# जीएचएच ०२९ स्ट्राँग कॉटन हायब्रिडचा भारतात प्रवेश

**अमरावती/प्रतिनिधी**

जीएचएच ०२९ बीजीआयआय हे नव्याने दाखल करण्यात आलेले श्रीराम बायोसीड जेनेटिक्सचे उत्पादन मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून महाराष्ट्रातील खान्देश, विदर्भ व मराठवाडा येथील शेतकऱ्यांमध्ये विशेष स्थान निर्माण करत आहे. सन १९९२ मध्ये स्थापन झालेली, श्रीराम बायोसीड जेनेटिक्स ही कंपनी उच्च उत्पन्न देणारे हायब्रिड बियाणे विकसित करून शेतकऱ्यांचे सबलीकरण करण्यासाठी कार्यरत आहे. कंपनीकडे स्वतःचे वैविध्यपूर्ण जर्मप्लासम असून, कंपनी भारत, इंडोनेशिया, थायलंड, व्हिएतनाम, बांगलादेश, चीन, नेपाळ, कम्बोडिया व नेपाळ येथील शेतकऱ्यांनाही सेवा देत आहे. बायोसीड शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट बियाण्यांच्या संपूर्ण मूल्यसाखळीद्वारे करत आहे म्हणजे, संशोधन व विकास, विविध ठिकाणी चाचण्या, उत्पादन, प्रक्रिया व मार्केटिंग. हैदराबाद येथे मुख्यालय असणारी ही कंपनी डीसीएम श्रीराम लि. या प्रतिष्ठित समूहाचा भाग आहे.गेले काही दिवस, युवा व बिंदासया अगोदरच्या उत्पादनांनी देशातील शेतकऱ्यांमध्ये जसे नाव निर्माण केले आहे, त्याप्रमाणे कॉटन हायब्रिड जीएचएच ०२९ बीजीआयआय हे नवे उत्पादन दाखल करण्यामध्ये कंपनीचे अधिकारी व्यस्त आहेत. नव्याने दाखल करण्यात आलेले हायब्रिड जीएचएच ०२९ बीजीआयआय हे खरेतर कामगारांची चणचण असण्याच्या सध्याच्या काळामध्ये शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी दाखल करण्यात आले आहे.